# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

MCAER कृषि परिषद

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com    दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

वेबसाईट : www.mcaer.org    फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१५१७/९८२८    दि.२५जुलै,२०१७

## परिपत्रक

**विषयः- कृषि तंत्र निकेतन पदविकाधारक उमेदवारांना कृषि पदवीच्या थेट द्वितीय व प्रथम वर्षात प्रवेशासाठी अतिरिक्त जागेवरील प्रवेश फेरी.**

कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारकांना कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षात तसेच पहिल्या वर्षात प्रवेश देण्याची प्रक्रिया नियोजित वेळापत्रकानुसार नुकतीच पूर्ण झालेली आहे. तथापि, कृषी तंत्र निकेतन अभ्यासक्रमाचा पुनर्तपासणीचा निकाल उशिरा मिळाल्यामुळे काही विद्यार्थ्यांचे गुणांमध्ये वाढ झालेली आहे. कागदपत्रांच्या अपूर्ततेमुळे काही उमेदवारांचे प्रवेश अर्ज रद्दबातल ठरविण्यात आले होते, तर काही उमेदवारांना इतर कारणास्तव विहित कालावधीत प्रवेश अर्ज दाखल करता आले नाहीत. अशा सर्व कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारक पात्र उमेदवारांना कृषी पदवी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून प्रवेश माहिती पुस्तिकेतील नियम व आरक्षणानुसार कृषी महाविद्यालयस्तरावर खालीलप्रमाणे 'अतिरिक्त जागेवरील प्रवेश फेरी' राबविण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारकांना कृषी पदवीच्या थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश देणे | दि.४ व ५ ऑगस्ट,२०१७ |
| २. | कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारकांना कृषी पदवीच्या पहिल्या वर्षात प्रवेश देणे | दि.७ व ८ ऑगस्ट,२०१७ |

कृषी महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेल्या जागांचा तपशील maha-agriadmission.in या संकेतस्थळावर दि. २/८/२०१७ रोजी उपलब्ध करून देण्यात येईल. प्रवेशोच्छुक पात्र उमेदवारांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी रिक्त जागा विचारात घेऊन संबंधित कृषी महाविद्यालयात आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व योग्य त्या शुल्कासह उपस्थित रहावे.

सर्व कृषी महाविद्यालयांनी maha-agriadmission.in या संकेतस्थळावर त्यांच्या लॉग-इनद्वारे उपस्थित पात्र उमेदवारांची माहिती भरावी व रिक्त जागांवर प्रवेश प्रक्रिया राबवावी. गुणवत्ता यादी / रद्दबातल यादीव्यतिरिक्त उमेदवारांकडून प्रवेश अर्ज शुल्क (खुला प्रवर्ग रू.१०००/- आणि आरक्षित प्रवर्ग

रू.५००/-) प्राप्त करून जमा होणारी एकत्रित रक्कम उमेदवारांच्या नावाच्या यादीसह धनाकर्षाद्वारे कृषी परिषदेकडे वर्ग करावी. धनाकर्ष 'Financial Advisor, MCAER, Pune' या नावे असावा.

**मा. महासंचालक यांच्या मान्यतेने.**

संचालक (शिक्षण)

प्रति,

३. मा.मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर / डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी.

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरच्या परिपत्रकास कृषी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व सूचना फलकांवर प्रसिध्दी द्यावी.

५. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८.

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, पदवी अभ्यासक्रमाच्या वरील प्रवेश कार्यपध्दतीविषयी सर्व कृषी विद्यापीठांतर्गत कृषी महाविद्यालयांना तसेच राज्यस्तरीय प्रवेश गुणवत्ता यादीतील सर्व विद्यार्थ्यांना आणि इतर प्रवेशोच्छुक उमेदवारांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे. तसेच प्रत्येक प्रवेश प्रक्रिया केंद्राच्या 'लॉग इन'मध्ये योग्य त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात **आणि तद्नुसार संबंधित सर्व महाविद्यालये तसेच राज्यस्तरीय गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवार आणि प्रवेश अर्ज रद्दबातल ठरविण्यात आलेले सर्व उमेदवार यांना भ्रमणध्वनी संदेशाद्वारे अवगत करावे.**

६. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, ई-१४, वर्ल्ड ऑफ मदर कॉम्प्लेक्स, जय गणेश व्हिजन, आकुर्डी, पुणे ४११ ०३५.

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर सदर परिपत्रक प्रसिध्द करण्यात यावे.